# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील महसूल विभागात मोठ्या प्रमाणात लाच स्विकारली जात असल्याबाबत**

**(१) ५८०२ (०४-०४-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लाच स्वीकारणा-यांमध्ये यंदाही महसूल विभाग प्रथम क्रमांकावर असून या विभागातही तलाठ्यांचीच संख्या जास्त आढळून येत असून मागील वर्षात १४९० जणांना पकडले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील तलाठी हे नागरिकांकडून सातबारा उता-यांवर नोंदी करण्यापासून ते वेगवेगळे दाखले देण्याकरीता लाच घेत असल्याचे उघड होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली असल्यास चौकशीमध्ये दोषीं आढळून आलेल्या व्यक्तीवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच लाचखोरीवर प्रतिबंध घालण्यास शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

सन २०१४ व २०१५ या वर्षात राज्यात लाच स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आलेल्या महसूल विभागातील एकूण ८२६ कर्मचाऱ्यांपैकी २८४ तलाठी आहेत.

(२) होय. हे खरे आहे.

(३) सन २०१४ मधील १४४ तलाठी व २०१५ मधील १३८ तलाठी आरोपींवर तपास पूर्ण करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) व (५) राज्यातील लाचखोरीला आळा घालण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत :-

लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत www.acbmaharashtra.net हे मोबाईल ॲप कार्यान्वित करण्यात आले आहे. तसेच टोल फ्री क्र. १०६४ ही हेल्पलाईन, Whats app No.९९३०९९७७०० फेसबुक वर www.facebook.com/MaharashtraACB या नावाने अकाऊंट www.acbmaharashtra.gov.in ही वेबसाईट असून त्यावर News, Events, Legal, RTI इत्यादीद्वारे असीबीमार्फत करण्यात आलेल्या कारवाईची सर्व माहिती कार्यपध्दतीसंबंधी एफ.एम.रेडीओ, दूरदर्शन यावर परिसंवाद आयोजित करुन जनजागृती करण्यात येते. एसीबीचे अधिकारी त्यांच्या अधिकार क्षेत्रात आठवडे बाजार, गर्दीच्या ठिकाणी एसटी स्टॅण्ड, रेल्वे स्टेशन, कॉलेज, मंदिर या ठिकाणी जाऊन असीबी संबंधी जनजागृती करतात. तसेच सर्व शासकीय कार्यालयाच्या दर्शनी भागावर असीबी संबंधी फोन नं., हेल्पलाईन नं. व वेबसाईट इत्यादी माहिती बोर्ड लाऊन प्रदर्शित करण्यात आलेली आहे. जनजागृतीकरिता सर्वत्र शहर व गावात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची माहिती असलेले पोस्टर, स्टीकर लावण्यात येतात. विभागाच्या ई-मेल आयडी acbwebmail@mahapolice.gov.in यावर तसेच ब्युरोमधील कार्यरत परिक्षेत्रीय मेल आयडीवर तक्रार केली जाऊ शकते.

---

**भटक्या कुत्र्यांचा उपद्रव थांबविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(२) १६७२२ (११-०८-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भटक्या कुत्र्यांनी नागरीकांना चावा घेण्याचे प्रकार वाढीस लागल्याने भटक्या कुत्र्यांचा उपद्रव थांबविण्यासाठी उपाययोजना करावी अशी मागणी महाराष्ट्रातून होत असल्याचे माहे एप्रिल-२०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुत्र्यांच्या चाव्याबाबतचा सन २००९ पासून २०१५ पर्यंतचा खटला मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निर्बिजीकरणाच्या मोहिमा अपेक्षित परिणाम मिळवू शकल्या नसल्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित खटल्याचा महाराष्ट्र शासनाने पाठपुरावा करण्याबाबत आणि कुत्रे ठार मारण्यास संमती देणा-या उच्च न्यायालयाच्या निकालावरील स्थगिती उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) कुत्र्यांची वाढती संख्या मर्यादित ठेवण्यासाठी, रेबीज निर्मुलनासाठी आणि मनुष्य-कुत्रा संघर्ष टाळण्यासाठी राज्यस्तरीय देखरेख समिती स्थापन करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागरीकांचे जिवरक्षण करताना अग्निशमन दलाच्या जवानाचा मृत्यू झाल्यास शहीदाचा दर्जा देण्याबाबत**

**(३) २०४०४ (१२-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशाचे रक्षण करताना मृत झालेल्या जवानाला शहीदचा दर्जा देण्याच्या पार्श्वभूमीवर नागरीकांचे जीवरक्षण करताना मृत पावलेल्या अग्निशमन दलाच्या अधिकारी किंवा जवानाला शहीदाचा दर्जा देण्याबाबत शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१७) :**(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ०९.०५.२०१५ रोजी काळबादेवी येथील दुर्घटना स्थळी कर्तव्य बजावत असते वेळी मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांना शहीद घोषित करण्याबाबतचा महानगरपालिकेचा ठराव शासनास सादर केला होता.

(२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, दिनांक २२.०७.२०१६ अन्वये मुंबईतील गोकुळ हाऊस या इमारतीला लागलेल्या आगीच्या दुर्घटनेत बचावाचे काम करताना वीर मरण आलेल्या महानगरपालिका अग्निशमन अधिकाऱ्यांना “शहीद” दर्जा देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर शहराला लागून वाहणाऱ्या इरई नदीवरील पुलाच्या बांधकामाबाबत**

**(४) ४६४२७ (२९-०४-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नविन चंद्रपूर शहराला लागून वाहणा-या इरई नदीवर (रामनगर-दाताळा मार्ग) मोठया उंच पुलाचे बांधकाम करण्यासाठी गृहनिर्माण विभागाने निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती मा.वित्त आणि नियोजन, वने मंत्री तथा पालकमंत्री जिल्हा चंद्रपर यांनी मा.मंत्री महोदयांकडे पत्र क्र. १३६३३७०/२०१५ दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ अन्वये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर पुलाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०९-०६-२०१७) :**(१) होय.

(२) शासन निर्णय, गृहनिर्माण विभागाच्या दिनांक १७ मार्च, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार दाताळा एम.आय.डी.सी. येथील इरई नदीवर पुल बांधण्याच्या कामास व त्यासाठी होणाऱ्या रु. ६५१९.३० लक्ष इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून या कामासाठी निधीही उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पोलीस पाटील नियुक्तीमध्ये आरक्षित उमेदवार नसल्यास आरक्षणात फेरबदल करण्याबाबत**

**(५) ५१६९७ (२४-०५-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पोलीस पाटील नियुक्तीमध्ये अनेक गावांमध्ये आरक्षित उमेदवार नसल्याने पोलीस पाटीलांची पदे रिक्त असल्याचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या ठिकाणी आरक्षित उमेदवार नसतील त्या ठिकाणी आरक्षणात फेरबदल करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :**(१), (२) व (३) पोलीस पाटील पदांकरीता शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक १६ ऑक्टोबर, २००८ अन्वये आरक्षण धोरण निश्चित करण्यात आले आहे.

या धोरणानुसार महसूल उपविभागाचा गट समजून आरक्षण ठरविण्याच्या प्रयोजनार्थ त्या त्या उपविभागातील पदे विचारात घेण्यात येतात. आरक्षण निश्चितीनंतर त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास, अदलाबदलीने पदे भरण्याबाबतची तरतूद आहे. याशिवाय, त्या गटातील उमेदवार उपलबध न झाल्यास असे पद खुल्या प्रवर्गातून भरण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर महापालिकेत सुमारे ३२० बोअरवेलचे कंत्राट जास्त दराने विशेष ठेकेदारास दिल्याबाबत**

**(६) ५५०४० (२९-०८-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील महापालिकेत सुमारे ३२० बोअरवेलचे कंत्राट दुप्पट दराने एका विशेष ठेकेदारास देऊन फार मोठा आर्थिक गैरव्यवहार केला जात असल्याची तक्रार एका समाजसेवी संघटनेने दिनांक २४ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीद्वारे सदर ठेकेदार बेजबाबदार असून, २०० फुटापेक्षा खोल खोदाई करणे कायद्याने अपराध असताना अनेक ठिकाणी ४०० ते ५०० फुट खोल खोदाई करत असल्याची बाब सुद्धा महानगरपालिका प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७)** :(१) अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी टंचाई काळात बोअरवेलच्या कामात ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये प्रभाग समिती-१ मध्ये १०.६० टक्के कमी दराच्या २ निविदा, प्रभाग समिती-२ मध्ये ११.७० टक्के कमी दराच्या २ निविदा, प्रभाग समिती-३ मध्ये ११.०७ टक्के कमी दराच्या ३ निविदा व प्रभाग समिती-४ मध्ये ११.७० टक्के कमी दराच्या ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या.

यााप्रमाणे कमी दराच्या निविदेस स्थायी समितीच्या मान्यतेने काम देण्यात आले होते.

(२) महानगरपालिकेमार्फत बोअरवेलचे अंदाजपत्रक तयार करताना २०० फुटाची खोली गृहीत धरण्यात आली आहे. त्या आधारावर स्वीकृत निविदाधारकास महानगरपालिकेमार्फत कार्यादेश देण्यात आला आहे.

सबब अतिरिक्त खोली करण्याची कोणतीही परवानगी महानगरपालिका प्रशासनामार्फत देण्यात आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरात वाहनांच्या जाळपोळीचे प्रकार सतत वाढत असल्याबाबत**

**(७) ५५२७५ (२३-०८-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात वाहनांच्या जाळपोळीचे प्रकार सतत वाढत असून माहे मे, २०१६ मध्ये एकाच आठवड्यात दोन प्रकार झाल्याने स्थानिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी पोलिस यंत्रणेकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१७)** :(१) माहे मे २०१६ मध्ये नाशिक शहर अंबड पोलीस ठाणे हद्दी मध्ये जाळपोळीचे २ घटना घडल्या, त्याबाबत गुन्हे दाखल करुन आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यांच्या अनुषंगाने स्थानिक नागरिकांमध्ये कोणतेही भितीचे वातावरण निर्माण झालेले नाही.

(२) व (३) अंबड पोलीस ठाणे गु.र.नं. ११२/२०१६ भा.दं.वि.क. ३३५, ४५०, ४२७ प्रमाणे व गु.र.नं. ११५/२०१६, भा.दं.वि.क. ३३५, ४२७, अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले.

सदर गुन्ह्यांमध्ये आरोपीतांना अटक करण्यात आली असून सदर आरोपीतांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

---

**भामा आसखेड प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(८) ५५६४० (१०-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या पूर्व भागाला पाणी देण्यासाठी भामा आसखेड प्रकल्पाचे काम मा.पालकमंत्री बैठका घेत नसल्याने प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार मा.पालकमंत्री यांनी बैठक घेऊन सदर प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) • मा.पालकमंत्री (पुणे) यांच्यामार्फत सदर योजनेच्या कामाबाबत वारंवार आढावा घेऊन पाठपुरावा केला आहे.

• पुणे महानगरपालिकेच्या विविध प्रश्नांबाबत विधानभवन, पुणे येथे मे, २०१६ मध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये पुणे महानगरपालिकेच्या भामा आसखेड पाणी पुरवठा योजनेच्या आढावा घेण्यात आला. सदर बैठकीमध्ये भामा आसखेड प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या शेतकऱ्यांच्या पुर्नवसनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी आठ दिवसांत शासनास सादर करावा. प्रस्ताव सादर करताच पुणे महानगरपालिकेमार्फत कामास सुरुवात करावी. तसेच भामा आसखेड प्रकल्पातून पुणे महानगरपालिकेच्या कुरळी जलशुध्दीकरण प्रकल्पातून आळंदी नगरपरिषदेस कच्च्या पाण्याचा (रॉ वॉटर) पुरवठा करण्यात यावा अशा सूचना शासनामार्फत देण्यात आल्या आहेत.

• त्याअनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांनी भामा- आसखेड प्रकल्पाग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव मदत व पुनर्वसन विभागाकडे सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव मदत व पुनर्वसन विभागाच्या विचाराधीन आहे.

• सदर प्रकल्पास विरोध करणाऱ्या आंदोलकांना ही वस्तुस्थिती कळवून हे आंदोलन मागे घेण्याबाबत व भामा- आसखेड उद्धवावरुन सुरु असलेल्या प्रकल्पाचे काम युध्द पातळीवर पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करणेबाबत सूचना पुणे महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

• शासनाने दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेने कुरळी जलशुध्दीकरण प्रकल्पातून आळंदी शहरास रॉ वॉटर पुरविण्यास मान्यता दिली आहे. सदर बैठकीनंतर स्थानिक सन्माननीय लोकप्रतिनिधी व भामा आसखेड धरणाच्या प्रकल्पग्रस्त शेतकरी यांनी योजनेच्या काही भागात काम सुरु करण्यास सहमती दर्शविली व त्याठिकाणी काम सुरु करण्यात आले.

• सदर योजनेचे काम डिसेंबर, २०१७ अखरे पूर्ण होणे अपेक्षित आहे.

---

**ठाणे जिल्ह्यातील दिघा येथील धरणाच्या पाणी वाटपावरुन नवी मुंबई-ठाण्यात वाद निर्माण झाल्याबाबत**

**(९) ५६१०२ (११-०८-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील दिघा येथे सुमारे १५० वर्षापुर्वी बांधलेल्या धरणातील पाणी वाटपावरुन नवी मुंबई-ठाण्यात वाद निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार नवी मुंबई-ठाण्यातील पाण्यावरुन निर्माण झालेला वाद मिटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

ठाणे जिल्ह्यामील दिघा येथील सुमारे १५० वर्षापूर्वी बांधलेल्या धरणातील पाणी वाटपावरुन नवी मुंबई व ठाण्यात कोणताही वाद निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील वाढते गुन्हे रोखण्याबाबत**

**(१०) ५६९२२ (२३-०८-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात माहे एप्रिल, २०१६ पर्यंत १७ जणांचे खून तर १६ जणांवर प्राणघातक हल्ले तसेच दरोडा, दंगल, हाणामाऱ्या करण्यात आले असून सन २०१४ च्या तुलनेत शहरातील गुन्ह्यांमध्ये दुपटीने वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व अशा घटनांना परिणामकारक पायबंद घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१७) :**(१) माहे एप्रिल, २०१४ व एप्रिल, २०१६ पावेतो गुन्ह्यांचा तपशील

| सदर | सन २०१४ | सन २०१६ |
|---|---|---|
| खुन | ०८ | १६ |
| खुनाचा प्रयत्न | १० | १६ |

| | | |
|---|---|---|
| दरोडा | ०१ | ०४ |
| दंगे | २९ | २४ |
| दुखापत | ८४ | १११ |

सदर तपशिलानुसार दंगे या सदराखाली घट झालेली असून इतर गुन्ह्यात काही प्रमाणात वाढ झालेली आहे.

(२) सदर गुन्ह्याच्या घटनांना परिणामकारक पायबंद घालण्याच्या दृष्टीने सरकारी चारचाकी, दुचाकी वाहन पेट्रोलींग, सायकल पेट्रोलिंग, अधिकारी/कर्मचारी यांचे पायी पेट्रोलिंग नेमण्यात येते. तसेच नियमित दैनंदिन नाकाबंदी, ऑपरेशन ऑल आऊट, कोम्बींग याद्वारे अभिलेखावरील माहितगार गुन्हेगारांना जेरबंद करण्यात येते.

(३) विलंब झालेला नाही.

---

**आंध्रुड (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथे सार्वजनिक विहिरीतील गाळ काढण्यास गेलेल्या युवकांचा गुदमरुन मृत्यू झाल्याबाबत**

**(११) ६०१२४ (१०-०८-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंध्रुड (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथे दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास सार्वजनिक विहिरीत साचलेला गाळ काढण्यास गेलेल्या दोन युवकांचा गुदमरुन मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा मृत्यू हा पाणी टंचाईमुळे झाला असून सदर युवकांच्या कुटूंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

अंध्रुड, ता.मेहकर, जि.बुलढाणा येथील पडीक असलेल्या सार्वजनिक विहिरीतील गाळ काढण्यास विहिरीत उतरलेला एक युवक विहिरीत दुषित वायुमुळे बेशुध्द पडला. तसेच त्यास वाचवावयास विहीरीत उतरलेले चार युवकसुध्दा विहिरीतील दुषित वायुमुळे विहीरीत बेशुध्द पडले.

या पाच युवकांपैकी दि.३१.०३.२०१६ रोजी दोन युवकांचा दिनांक ०३.०४.२०१६ रोजी एका युवकाचा उपचारादरम्यान रुग्णालयात मृत्यू झाला. याप्रकरणी डोणगांव पो.स्टे येथे मर्ग नं.६/१६ कलम १७४ जा.फौ. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) पडीक विहिरीतील गाळ काढण्याकरीत विहिरीत उतरलेल्या युवकांचा विहीरीतील दुषित वायुमुळे गुदमरुन मृत्यू झाला.

तीन मृतांपैकी दोन युवकांच्या कायदेशीर वारसांना मुख्यमंत्री निधीमधून मानवतावादी दृष्टीकोनातून प्रत्येकी एक लाख रुपयांचे सानुग्रह अनुदन वितरीत करण्यात आलेले आहे. तर एका मृतक शेतकऱ्याच्या वारसास स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत मदत देण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

---

**वेताळवाडी (ता.सोयगाव, जि.औरगांबाद) येथील लघुसिंचन तलावाच्या पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन शेतकऱ्यांनी फोडून शेती पिकासाठी पाणी घेतल्याबाबत**

**(१२) ६२९९६ (२४-०८-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोयगाव (जि.औरगांबाद) नगर परिषदेंतर्गत असलेल्या वेताळवाडी येथील लघुसिंचन तलावाच्या पिण्याच्या पाणी असलेली पाईपलाईन अनेक शेतकऱ्यांनी फोडून शेती पिकासाठी पाणी घेतल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान समोर आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करून येथील पाणीचोरी थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

माहे एप्रिल, २०१६ दरम्यान सोयगाव नगर पंचायत पाणी पुरवठा हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत होता. माहे एप्रिल, २०१६ ते ऑगस्ट, २०१६ पर्यंत पाणी पुरवठा सुरळीत होता. वेताळवाडी येथील लघुसिंचन तलावावरील पिण्याच्या पाण्याची जलवाहिनी फोडून शेतीसाठी पाणी घेतल्याचे निदर्शनास आले नसल्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेले आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयास या स्वरुपाची तक्रार प्राप्त झालेली नाही.

माहे, ऑगस्ट, २०१६ पासून पाणी पुरवठा सोयगाव नगरपंचायती मार्फत करण्यात येत असून पाणी पुरवठा सुरळीत आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वांद्रे बँड स्टॅण्ड (मुंबई) येथे विद्यार्थीनीस वाचवितांना श्री.रमेश वळंजू यांचा समुद्रात बुडून मृत्यू झाल्याबाबत**

**(१३) ६४१९२ (२४-०८-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वांद्रे बँड स्टॅण्ड (मुंबई) येथे सेल्फी काढण्याच्या नादात समुद्रात पडलेल्या तरन्नुम अंसारी (वय १८) विद्यार्थीनीस वाचविताना कुटूंबातील कमावते श्री.रमेश वळंजू (वय

४०) या मध्यवर्गीय इसमाचा तसेच सदर विद्यार्थीनीचा समुद्रात बुडून दुदैवी मृत्यू ओढवल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृतक श्री.रमेश वळंजू ह्या कुटूंबातील कर्ता पुरुषाचा मृत्यू झाल्याने त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांची उपासमार होत असल्याने शासनामार्फत आर्थिक मदत देण्याबाबतचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अपघातास आमंत्रण देणारी सेल्फी स्टीक बॅन करण्याविषयी सार्वत्रिक मागणी होत असल्याने या संदर्भातील निर्णयही शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील सर्व पर्यटन स्थळांवर संभाव्य अपघात टाळण्यासाठी सेल्फी काढण्यासंदर्भात धोक्याची सूचना तसेच सेल्फी काढण्यासाठी सुरक्षित स्पॉटची माहिती असलेले बोर्ड लावण्यासंदर्भात शासनामार्फत आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :**(१) दिनांक ९ जानेवारी, २०१६ रोजी सकाळी १०.५० वा. वांद्रे बँड स्टँड येथील समुद्रकिनारी सेल्फी काढत असतांना तीन तरुणी समुद्राच्या पाण्यात पडल्या असता, त्यातील दोन तरुणींना श्री.रमेश वळंजू यांनी पाण्याबाहेर काढून त्यांचे प्रमाण वाचविले. तर तिसऱ्या तरुणीस पाण्याबाहेर काढण्याचा प्रयत्न करीता असता ते दोघेही पाण्यात बुडाले. पैकी श्री.वळंजू यांचा मृतदेह धारावी येथील खाडीमध्ये मिळून आला. बेपत्ता तरुणीचा अद्याप शोध लागलेला नाही.

(२) सदर बाब ही नैसर्गिक आपत्ती या सदराखाली मोडत नसल्याने आर्थिक मदत देय नाही.

(३) नाही.

(४) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तलयाअंतर्गत एकूण २८ नो सेल्फी झोन आहेत. सेल्फी काढतांना वाढत असलेल्या अपघातांची संख्या लक्षात घेता अशा घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्तालयांमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात येते.

१. संबंधित पोलीस ठाणे हद्दीतील पर्यटन स्थळे, शाळा, महाविद्यालये व समुद्रकिनाऱ्याच्या ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सुरक्षा रक्षक, पोलीस गस्ती वाहन यांच्यामार्फत सेल्फी काढतांना होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती पर्यटक व शाळा महाविद्यालयातील मुलांना वेळोवेळी देण्यात येत आहे.

२. समुद्रकिनारी सेल्फी काढतांना दिसून आल्यास मनाई करण्यात येते.

३. महाविद्यालयीन मुलांमध्ये धोकादायक ठिकाणांवर सेल्फी काढण्यात येऊ नये म्हणून जनजागृती करण्यात येत आहे.

४. सेल्फी काढतांना होणारे अपघात लाक्षात घेता गस्तीवर असलेले पोलीस अधिकारी व अंमलदार, तसेच बीट मार्शल यांना नमूद ठिकाणी युगूल, कुटूंब आणि इतर व्यक्ती सेल्फी काढतांना आढळल्यास त्यांना अटकाव करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

५. नमूद ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची तजविज ठेवण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई, तसेच ठाणे जिल्हयात नायजेरियन नागरिकांचे उपद्रव वाढत असल्याबाबत**

**(१४) ६५०२४ (१०-११-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, तसेच ठाणे जिल्हयातील मिरारोड, भाईंदर, नायगाव, वसई, दिवा व नवी मुंबईतील कोपरखैराणे याठिकाणी भाड्याने घरे घेऊन नायजेरियन नागरिक राहत असून मागील काही दिवसापासून सदर परिसरात नायजेरियन नागरिकांच्या संख्येत कमालीची वाढ झाली असून त्यांचा उपद्रव वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने तस्करी प्रकरणी पकडलेल्या परदेशी नागरिकात ९९ टक्के आरोपी हे नायजेरियन आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :**(१) होय.

(२) दि. १ जानेवारी, २०१६ पासून आज पावेतो अंमली पदार्थ विरोधी कक्षाने एकुण २२ परदेशी नागरीकांविरुध्द अंमली पदार्थ विरोध कायद्याखाली गुन्हे दाखल केले आहेत. त्यापैकी सर्व २२ आरोपी नायजेरीयन आहेत.

(३) अंमली पदार्थ विरोधी कक्ष तसेच स्थानिक पोलीस यांचेकडून नायजेरीयन व इतर परदेशी नागरिकांवर पाळत ठेऊन कारवाई केली जाते. नायजेरीयन वस्ती असलेल्या भागात अंमली पदार्थ विरोधी कक्षामार्फत लक्ष ठेवण्यात येते. ज्यांचेकडे प्रत्यक्षात अंमली पदार्थ आढळून येत नाहीत परंतु त्यांचा अंमली पदार्थ व्यवसायात संबंध असल्याची खात्री झाल्यावर तसेच वैध कागदपत्रे नसलेल्या परदेशी नागरिकांना मायदेशी परत पाठविण्याची कारवाई करण्यात येते. अंमली पदार्थ विरोधी गुन्हयामध्ये अटक झालेल्या परदेशी नागरिकांची माहिती विशेष शाखा-२ मार्फत संबंधित दुतावासास तसेच नार्कोटीक्स कंट्रोल ब्युरोला कळविली जाते. व्हिसा अटींचे उल्लंघन करणाऱ्या आणि कारागृहातून शिक्षा भोगून सुटलेल्या परदेशी नागरिकांना एफ.आर.आर.ओ. मुंबई यांचेमार्फत मायदेशी परत पाठविण्याची कारवाई करुन त्यांनी परत भारतात येऊ नये यासाठी ब्लॅक लिस्ट केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील बेपत्ता नागरिकांचा तपास न लागल्याबाबत**

**(१५) ६६०४६ (१९-०१-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात सन २०१५-१६ या एका वर्षात ८६४ नागरिक बेपत्ता झाल्याच्या तक्रारी रायगड जिल्हयातील पोलीस ठाण्यात करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ८६४ बेपत्ता नागरिकांपैकी ६८९ जणांचा शोध लावण्यात आला असून अद्याप १७५ बेपत्ता नागरिकांचा शोध लागू शकला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच नागोठणे (ता.रोहा, जि.रायगड) येथून दिनांक १५ सप्टेंबर, २०१६ वा त्यासुमारास ३ मतिमंद नागरिकांचे अपहरण झाले असून वेडसर, मतिमंद अशा नागरीकांना हेरून त्यांचे अपहरण करून त्यांचे अवयव काढून घेणारी टोळी कार्यरत असण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बेपत्ता नागरिकांचा शोध घेण्यासाठी व संबंधित गुन्हेगारांचा शोध लावून त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१७) :**(१) व (२) रायगड जिल्ह्यात सन २०१५-१६ या एका वर्षामध्ये एकूण ७५८ नागरिक बेपत्ता झाल्याच्या तक्रारी रायगड जिल्ह्यातील पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आल्या आहेत. त्यापैकी ६५२ बेपत्ता झालेल्या नागरिकांचा शोध लागला आहे. १०६ नागरिकांचा शोध घेण्यात येत आहे.
(३) नागोठाणे (ता.रोहा, जि.रायगड) येथून दिनांक १५ सप्टेंबर, २०१६ वा त्यासुमारास ३ मतिमंद नागरिकांचे अपहरण झालेबाबत तसेच वेडसर मतिमंद अशा नागरिकांना हेरुन त्यांचे अपहरण करुन त्यांचे अवयव काढून घेणारी टोळी कार्यरत असलेबाबत नागोठाणे पोलीस हद्दीत तसेच रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रातील इतर पोलीस ठाण्यामध्ये कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच अशी कोणत्याही प्रकारची घटना घडलेली नाही.
(४) बेपत्ता होणाऱ्या इसमांचा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाल्यानंतर कसोशीने शोध घेण्यात येतो. तसेच १८ वर्षाखालील बेपत्ता होणाऱ्या मुलामुलींचे संदर्भात भारतीय दंड संहिता कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात येत असून गुन्ह्यातील आरोपीताविरुद्ध कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टी (जि.बीड) येथे स्वतंत्र उपविभागीय पोलीस अधीक्षक कार्यालय उभारण्याबाबत**

**(१६) ६६१४२ (१७-०१-२०१७). अ‍ॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी (जि.बीड) येथे स्वतंत्र उपविभागीय पोलीस अधीक्षक कार्यालय उभारण्याबाबतची मागणी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) आष्टी, जि.बीड येथे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयासाठी दिनांक १५.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ पश्चिम (जि.ठाणे) येथील पोलीस स्टेशनची इमारत मोडकळीस आल्याबाबत**

**(१७) ६६२६५ (१७-०१-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ पश्चिम (जि.ठाणे) येथील पोलीस स्टेशनची इमारत मोडकळीस आल्याने त्याठिकाणी नवीन पोलीस इमारत बांधण्यासंदर्भात मा.राज्यमंत्री गृह (शहरे) यांच्या मंत्रालयीन दालनात दिनांक ८ ऑक्टोबर, २०१५ रोजी बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीच्या अनुषंगाने पोलीस आयुक्त, ठाणे यांच्यामार्फत पोलीस महासंचालक यांच्याकडे सादर करण्यात आलेल्या नवीन पोलीस इमारतींबाबतच्या प्रस्तावावर योग्य ती कार्यवाही करण्याकरिता पोलीस महासंचालकांनी व्यवस्थापकीय संचालक, पोलीस गृह निर्माण व कुटुंब कल्याण यांच्याकडे दिनांक २९ मार्च, २०१६ रोजी प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने व्यवस्थापकीय संचालक, पोलीस गृह निर्माण व कुटुंब कल्याण यांच्या कार्यालयाकडून माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये नवीन वास्तू विशारद नेमले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नवीन इमारतीच्या बांधकामाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) मा.राज्यमंत्री गृह (शहरे) यांच्या दालनात दिनांक १२ ऑक्टोबर, २०१५ रोजी बैठक घेण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) सदर इमारतीबाबत व्यवस्थापकीय संचालक, पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांना प्रस्ताव प्राप्त झालेला असून त्यांनी सदर बांधकामाची वास्तुविशारद नेमले आहेत. सदर वास्तुविशारद यांच्याकडून बांधकाम आराखडा तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथील पोलीस स्थानकांची झालेली दुरावस्था.**

**(१८) ६६३८४ (१७-०१-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा तालुक्यातील (जि.अहमदनगर) पोलीस स्थानकांची दुरावस्था झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस स्थानकांच्या इमारतीची तातडीने दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) होय.

(२) याबाबत पोलीस विभागाकडून सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदनगर यांच्यासोबत इमारती दुरुस्तीबाबत पाठपुरवा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोनई व शिंगणापूर (जि.अहमदनगर) पोलीस ठाण्याअंतर्गत सुरु असलेल्या अवैध धंद्याबाबत**

**(१९) ६६७९६ (१७-०१-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनई व शिंगणापूर (जि.अहमदनगर) पोलीस ठाण्याअंतर्गत अवैद्य मद्य विक्री, मटका, जुगार आदी अवैध धंदे सुरु असल्याने स्थानिक नागरिक विशेषतः महिला खूपच त्रस्त झाल्या असून त्यांनी वेळोवेळी तक्रारी करुन आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस खात्यामार्फत दिखाव्यासाठी खोट्या केसेस दाखल केल्या जातात परंतु प्रत्यक्ष मुख्य गुन्हेगारांवर गुन्हे दाखल न करता अन्य कोणाला तरी पकडले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही,

(२) व (३) हे खरे नाही.

सोनाई व शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यांतर्गत अवैध धंद्याचे संपूर्ण उच्चाटन करण्यासाठी अवैध धंदे करणाऱ्याविरुध्द खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणी सोनाई पोलीस स्टेशन येथे सन २०१६ मध्ये जुगाराचे ४३ गुन्हे दाखल असून ६४ आरोपीना अटक करुन त्यांच्या कडून रुपये ४६,०९१/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला तर दारुबंदीबाबत ५३ गुन्हे दाखल असून ५३ आरोपींना अटक करण्यात आली असून रुपये ४४८२३/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

शनिशिंगणापूर पोलीस स्टेशन येथे सन २०१६ मध्ये जुगाराचे २० गुन्हे दाखल असून ४८ आरोपींना अटक करुन त्यांच्या कडून रुपये १,३१,७५०/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला तर दारुबंदीबाबत १५ गुन्हे दाखल असून १५ आरोपींना अटक करण्यात आली असून रुपये १०८४०/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**मौजे सातपाटी, मुरबे (ता.जि.पालघर) समुद्रामध्ये उभारलेल्या बोया शिरगावच्या किना-यांवर बेवारस अवस्थेत पडून असल्याबाबत**

**(२०) ६६८५८ (१०-०१-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सातपाटी, मुरबे (ता.जि.पालघर) येथून समुद्रात मासेमारीकरिता जाताना धोकादायक खडकापासून बचाव व्हावा यासाठी समुद्रामध्ये उभारलेल्या बोया दिनांक १० जून, २०१६ पासून शिरगावच्या किना-यांवर बेवारस अवस्थेत पडून आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातपाटी, मुरबे, खारेकुरण या बंदरामधून लहान मोठया ३०० ते ४०० बोटी मासेमारीकरिता समुद्रामध्ये जात असतांना समुद्रामध्ये मोठमोठे खडक असल्यामुळे बोटीचे नुकसान होऊ नये म्हणून दिपस्तंभ व बोये बसवण्यात आले असून सदर बोया तुटल्यामुळे ऐन मच्छिमारीच्या वेळी बोटींचे नुकसान होऊ नये म्हणून याबाबत सातपाटी सव्होइप सहकारी संस्थेच्या अध्यक्षांनी माहे जुलै, २०१६ मध्ये मेरीटाईम बोर्डाला पत्र देउनही अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बोया बसवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०५-२०१७) :**(१) हे खरे नाही.

बोया सातपाटी मच्छिमार विविध कार्यकारी संस्था यांच्या कंपाऊंड मध्ये सुरक्षितरित्या ठेवण्यात आलेला होता. त्यावरील सोलर लाईट सहायक बंदर निरीक्षक, सातपाटी यांच्या कार्यालयात सुरक्षित ठेवण्यात आलेला होता.

(२) व (३) पावसाळी हंगामामध्ये सदर बोया पुन्हा बसविणे शक्य नव्हते. आता सदर बोया त्या ठिकाणी सुस्थितीत बसविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे शहरातील चहूबाजूंना असलेल्या हिरव्यागार टेकड्या असुरक्षित झाल्याबाबत

**(२१) ६७३४५ (१७-०१-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील मुख्यत: भारती विद्यापीठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत जांभूळवाडी परिसरात एकट्या महिलेला वार करून खून, जेटप्पा सिद्धमणी यांचा कात्रज घाटात खून, वारजे येथील गोकूळनगर पठारावर अल्पवयीन मुलीवर बलात्कार तसेच दत्तवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत वाघजाई टेकडीवर दोघांनी मिळून तरुणाचा खून इत्यादी घटना घडल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहर असुरक्षित झाले असून याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कठोर पावले उचलण्यासंदर्भात शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) उपरोक्त नमुद ४ घटनांबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.

अ) भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत जांभूळवाडी परिसरात एकट्या महिलेला वार करुन खून केल्याच्या घटनेबाबत अज्ञात आरोपींविरुद्ध भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं.१४/२०१६ भा.दं.वि. कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ब) जेट्टप्पा दिड्डीमनी याचा कात्रज घाटात झालेल्या खूनाबाबत दोन आरोपींविरुद्ध भारती विद्यापीठ पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१२५/२०१६ भा.दं.वि. कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करुन दोन्ही आरोपींना अटक केली आहे. तसेच सदर गुन्ह्यातील आरोपीविरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

क) वारजे येथील गोकुळनगर पठारावर अल्पवयीन मुलीवरील बलात्काराच्या प्रकरणात फिर्यादीचे तक्रारीवरुन एका आरोपीविरुद्ध वारजे माळवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.३८१/२०१६ भा.दं.वि. कलम ३७६, बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध अधिनियम ४, ६, ८ प्रमाणे गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्हा तपासावर आहे.

ड) दत्तवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाघजाई टेकडीवर झालेल्या खूनाबाबत दोन आरोपींविरुद्ध दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१९७/२०१६ भा.दं.वि. कलम ३०२, २०१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करुन गुन्ह्यातील दोन्ही आरोपींना अटक केली असून त्यांचेविरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

तसेच पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रात गुन्ह्यांना आळा घालणेकामी पुढीलप्रमाणे उपाययोजना केली आहे.

शहरातील गुंड टोळ्यांचा बिमोड करण्यासाठी सन २०१५ मध्ये १२ गुंडाचे विरुद्ध व सन २०१६ मध्ये २५ गुंडाचे विरुद्ध एम.पी.डी.ए. अंतर्गत स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आलेली आहे. सन २०१५ मध्ये १७ संघटीत टोळ्यांचे विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ (मोक्का) अन्वये कारवाई करण्यात आली आहे. तसेच सन २०१५ मध्ये १४६ इसमांचे विरुद्ध व सन २०१६ मध्ये ११७ इसमांचे विरुद्ध हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे.

संघटीत गुन्हेगारी टोळ्यांना व इतर गुन्हेगारीला आळा बसावा याकरीता गुन्हे शाखेचे अंतर्गत २ स्वतंत्र संघटीत गुन्हेगारी विरोधी पथके कार्यरत असून त्या पथकामध्ये पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी प्रमुख म्हणून काम पाहतात. त्या पथकाकडून पुणे शहरातील सर्व संघटीत टोळ्यांच्या हालचालीवर नियंत्रण ठेवले जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरुर (जि.पुणे) पोलीस ठाण्याकरीता नवीन इमारत बांधण्याबाबत

**(२२) ६७४५३ (१७-०१-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि.पुणे) शहरातील पोलीस ठाण्याचा कारभार ब्रिटीशकालीन धोकादायक इमारतीत सुरु असून पोलीस कर्मचाऱ्यांना येथे पुरेशी जागा नसून महिला कर्मचाऱ्यांना शौचालय व चेजिंग रुम या सारख्या सुविधाही उपलब्ध नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरुर पोलीस ठाण्याकरीता नवीन इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) शिरुर पोलीस ठाणे हे ब्रिटीशकालीन इमारतीमध्ये सुरु आहे. सदर पोलीस स्टेशन मधील महिला अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता दिनांक ०२.०७.२०१६ रोजी प्रसाधनगृह व विश्रामगृहाचे बांधकाम करण्यासाठी मान्यता देण्यात आली असून सदर निधी हा सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांना वर्ग करण्यात आला असून बांधकाम प्रगतीपथावर आहे.
(२) शिरुर पोलीस ठाणे, नवीन इमारत बांधण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडून अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील प्रांत अधिकारी व तहसील कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यांच्या सही शिक्क्यांचे खोटे नियुक्तीपत्र देऊन फसवणूक करण्यात आल्याबाबत

**(२३) ६७६५५ (११-०१-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील सुमारे पाच तालुक्यातील प्रांताधिकारी व तहसील कार्यालयात लिपिक पदावर रुजू करण्यात येत असल्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सही शिक्क्यांचे खोटे नियुक्तपत्र देऊन अनेक बेरोजगार युवकांची लाखो रुपयांची फसवणूक केली असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१७) :**(१) होय , हे खरे आहे.
(२) होय, उक्त प्रकरणी खाली नमुद पोलीस स्टेशनला पुढील प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे.

१) इगतपुरी पोलीस स्टेशन गु.र.नं. ७६/१६
२) मालेगाव छावणी पोलीस स्टेशन गु.र.नं. ८४/१६
३)येवला शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. ४३/१६
४) नांदगाव पोलीस स्टेशन गु.र.नं. ५२/१६
५) निफाड पोलीस स्टेशन गु.र.नं. ५१/१६

भा.दं.वि कलम ४२०, ४६४, ४६५, ४६८, ४७१, ४७३, ४७४, ३४ प्रमाणे आरोपीतांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यातील आरोपीतांना सदर गुन्हयात अटक करण्यात आले असून सदरचे गुन्हे पोलीस तपासावर आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील आरोग्य सहायक व शिपाईस लाच घेतांना पकडल्याबाबत**

**(२४) ६७८९९ (१७-०१-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील आरोग्य सहायक नंदकुमार कोळी व शिपाई मोहन सोनवणे या दोघांना दिनांक ७ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या सुमारास लाच घेतांना पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) लोकसेवक नंदकुमार कोळी आरोग्य सहायक, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी पंचायत समिती हातकणंगले येथील शिपाई मोहन सोनवणे यांच्यामार्फतीने दि. ८ सप्टेंबर, २०१६ च्या सुमारास तक्रारदाराकडून लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडल्याने त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यातील तरतुदीनुसार शाहुपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गु.र.नं. ३७६/२०१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून वरील दोनही आरोपींना मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर यांनी दि. ८.९.२०१६ पासून शासकीय सेवेतून निलंबित केले आहे.

---

**जळगाव जिल्हयातील वावडदा गावाजवळ पोलीसांनी शालेय पोषण आहाराचा तांदूळ जप्त केल्याबाबत**

**(२५) ७१०६४ (१७-०१-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयातील वावडदा गावाजवळ म्हसावद एरंडोल मार्गावर दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी एमआयडीसी पोलीसांनी शालेय पोषण आहाराचा १ लाख ८ हजार रुपयांचा तांदूळ वाहन चालकासह ताब्यात घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.

दि. १०/८/२०१६ रोजी पेट्रोलिंग दरम्यान एक आयशर गाडी रु. १,०९,५००/- किंमतीचा शालेय पोषण आहाराचा तांदुळ बाजारात विक्रीसाठी घेवुन जाताना पकडण्यात आली.

(२) सदर प्रकरणी एम. आय. डी. सी. पोलीस स्टेशन जळगाव येथे दि.११/०८/२०१६ रोजी भाग-६ गु.र.नं. ३११८/१६ जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३ व ७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ६ आरोपींना अटक करण्यात आली होती. सध्या आरोपी जामिनावर आहेत.

(३) विलंब झाला नाही.

---

**पीएसिएल (PACL) लि. दिल्ली या कंपनीने गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याबाबत**

**(२६) ७२१४२ (१६-०१-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पीएसिएल (PACL) लि. दिल्ली हि कंपनी रिअल इस्टेट मध्ये काम करणारी नसून कलेक्टिव्ह इन्व्हेस्टमेंट यामध्ये येते असा निर्णय सेबीने माहे ऑगस्ट, २०१२ मध्ये दिल्याने सदर कंपनीने भारतातील ५ करोड गुंतवणूकदार आणि त्यांची ४९,१०० करोड रुपयांची गुंतवणूक व त्यापैकी महाराष्ट्रातील जवळ जवळ एक कोटी गुंतवणूकदार आणि त्यांची १५००० कोटीं रुपयांची गुंतवणूक या सर्व गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी माननीय SAT COURT यांनी गुंतवणूकदारांचे पैसे ३ महिन्यात परत करा असा निर्णय दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, PACL ह्या कंपनीची सर्व प्रॉपर्टी विक्री करून दिनांक ०२ ऑगस्ट, २०१६ पर्यंत सर्व गुंतवणूकदारांचे पैसे परत करा असा निर्णय मा.सुप्रीम कोर्ट यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.सुप्रीम कोर्ट यांच्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७)** :(१) होय, हे अंशतः खरे आहे.

पर्ल्स या कंपनी विरुध्द पोलीस आयुक्त, पुणे शहर/अमरावती शहर तसेच पोलीस अधीक्षक, कोल्हापूर/सातारा/बीड/गोंदिया व लोहमार्ग पुणे या ठिकाणी गुन्हे दाखल आहेत. तथापि पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या कार्यक्षेत्रात आर्थिक गुन्हे विभाग येथे श्री.तौफिक अहमदखान यांच्या तक्रारीवरुन PACL या कंपनी विरोधात प्राथमीक चौकशी दाखल करण्यात आली होती. परंतु सदर प्रकरणी केंद्रिय अन्वेषण ब्युरो, नवी दिल्ली येथे गुन्हा दाखल असल्याने याबाबत करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीचे मूळ कागदपत्रे केंद्रिय अन्वेषण ब्युरो, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविण्यात आली आहेत.

राज्यातील अन्य जिल्ह्यात या प्रकरणी गुन्हे दाखल नाहीत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे. या करिता श्री.आर.एम.लोढा, माजी मुख्य न्यायाधिश, सर्वोच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने सेबी (SEBI) हा आदेश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील गावपातळीवरील पोलीस पाटील यांना किमान वेतन श्रेणी लागू करण्याबाबत**

**(२७) ७२१५९ (१७-०१-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गावपातळीवरील पोलीस पाटील या पदावरील व्यक्तींना किमान वेतन श्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्यानुषंगाने पुढील कार्यवाही व अंमलबजावणीची सद्यस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :**(१), (२) व (३) पोलीस पाटील हे पद मानधनी तत्वावरील अवर्गीकृत पद असल्याने त्या पदास कोणतीही वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली नाही. तथापि, राज्यातील कोतवाल, पोलीस पाटील आशा वर्कर्स व अंगणवाडी सेविकास या व अशा मानधन असलेल्या कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी दिनांक १८.०३.२०१७ च्या शासन निर्णयान्वये “एकछत्र” योजना तयार करण्यासाठी अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे अध्यक्षतेखाली सचिव समिती गठीत करण्यात आली आहे.

---

**नवी मुंबई महापालिका आयुक्तांनी ठोक मानधनावर काम करणा-या शिक्षकांना कामावरुन कमी करण्यात आल्याबाबत**

**(२८) ७३८७७ (२०-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महापालिका आयुक्तांनी १२२ ठोक मानधनावर काम करणा-या शिक्षकांना कामावरुन कमी केल्यानंतर या शिक्षकांनी न्यायालयात धाव घेऊन विनावेतन काम करण्याची तयारी दर्शवून गेल्या महिन्याभरापासून विना वेतन काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अचानकपणे शिक्षण मंडळाने ठोक मानधनावर १६१ शिक्षक भरतीची जाहिरात माहे डिसेंबर, २०१६ च्या सुमारास काढली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची भरती करतांना विनावेतन काम करणा-या शिक्षकांना या भरतीच्या वेळी ठोक मानधनावर त्यांची भरती करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) अंशतः खरे आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात ठोक मानधनावर काम करणाऱ्या शिक्षकांना कामावरुन कमी करण्यात आल्याची बाब खरी नाही.

तथापि, सदर शिक्षकांनी सेवेत कायम होण्यासाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने, मा.उच्च न्यायालयाच्या दि.२१/१०/२०१६ च्या आदेशातील अटी व शर्तीनुसार विनावेतन काम करण्यास इच्छूक असल्याबाबतचे हमीपत्र ज्या शिक्षकांनी दिलेले आहे, अशा शिक्षकांना दि.३०/०४/२०१७ पर्यंतचे तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती आदेश देण्यात आले होते.
(२) होय, हे खरे आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकरीता ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात रिक्त पदावर १६१ शिक्षक भरण्याबाबत माहे डिसेंबर, २०१६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.
(३) मा.उच्च न्यायालयाच्या दि.२७/०१/२०१७ च्या आदेशान्वये सदर भरतीस स्थगिती देण्यात आली आहे. सद्यस्थितीत तात्पुरत्या स्वरुपातील ठोक मानधनावरील शिक्षकांचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महापालिकेतील टॅब गैरव्यवहाराची चौकशी

**(२९) ७३९९३ (२०-०४-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महापालिकेतील टॅब खरेदी गैरव्यवहाराची सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, सदर गैरव्यवहारास जबाबदार अधिकारी कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील टॅब खरेदी संदर्भातील काही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

तथापि, सदर तक्रारींमध्ये तथ्य आढळून आलेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील जुन्या चाळी आणि इमारतींमधील ४० वर्ष जुन्या सदोष वायरिंगने अपाघातांचा धोका वाढवला असल्याबाबत**

**(३०) ७४२२१ (२०-०४-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जुन्या चाळी आणि इमारतींमधील ४० वर्ष जुन्या सदोष वायरिंगने अपाघातांचा धोका वाढवला असल्याचे धक्कादायक बाब अग्निशमन दलाच्या अहवालातून समोर आली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६ मध्ये दरमहा सरासरी ३००-३५० दुर्घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१६च्या सप्टेंबरच्या महिन्यात सर्वाधिक ५५० दुर्घटना घडल्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती अशा घटना रोखण्यासाठी लोकांमध्ये जागरुकता निर्माण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) मुंबईतील जुन्या चाळी व इमारतींमध्ये असलेली विद्युत यंत्रणा जुनी असल्याकारणाने बऱ्याच वेळेला आगीच्या दुर्घटना घडल्याचे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या निदर्शनास आले आहे.

(२) सन २०१६ मध्ये विद्युत आगीच्या दरमहा सरासरी २६० घटना घडल्या आहेत.

(३) माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये विद्युत आगीच्या २६० घटना घडल्या आहे.

(४) शहरातील वाढत्या आगीच्या घटना रोखण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दल तसेच आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

• मुंबई शहर व उपनगर जिल्हे यांमध्ये विद्युत जोडण्यांशी संबंधित असलेल्या बेस्ट, रिलायन्स, टाटा व एम. एस. ई. बी. यांना इलेक्ट्रीसिटी ॲक्टप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्याबाबत महानगरपालिकेने दिनांक ०३.११.२०१६ रोजी सुचित केले आहे.

• मुंबई अग्निशमन दलाने "अग्निशमन स्वयंसेवक" या उपक्रमाद्वारे शहरातील नागरिकांना, दुर्घटनेच्या वेळी मदत मिळण्यासाठी इमारतीची अग्निशमन यंत्रणा, उपाययोजना तसेच, अग्निशमनाचे विविध प्रकार, आग विझविण्याच्या उपाययोजना इत्यादीबाबत आतापर्यंत ६००० पेक्षा जास्त नागरिकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

• मुंबई अग्निशमन दलामार्फत, शाळा, महाविद्यालये, रहिवाशी इमारती व संकुले तसेच कार्यालये व औद्योगिक व्यवस्थापनांमध्ये प्रत्यक्ष आगीची दुर्घटना घडल्यास अग्निशमन दल पोहचण्यापूर्वी करावयाच्या उपाययोजना तसेच प्रत्यक्ष आग विझविण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीबाबतची माहिती दिली जाते.
• ज्या घरांच्या अंतर्गत वायरींग जुन्या झालेल्या आहेत त्या त्यांनी दुरुस्त करुन घेण्याबाबत जनजागृती मोहिम महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातर्फे हाती घेण्यात येत असते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयात विविध संवर्गातील अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(३१) ७४४६६ (२०-०४-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), अॅड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयात संचालक स्तरावरील अनेक पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात व्यवसाय शिक्षण व संचालनालयाच्या अंतर्गत येणा-या विभागात ‘अ’, ‘ब’, ‘क’ आणि ‘ड’ प्रवर्गातील मंजूर १४ हजार ६३६ पदांपैकी १० हजार ४७६ पदे कार्यरत असली तरीही त्यातील अनेक कर्मचारी अधिकारी हे मागील काही वर्षात निवृत्त झाल्याने तब्बल ४ हजार १६० हून अधिक पदे रिक्त आहेत व या रिक्त पदांपैकी सर्वात जास्त पदे ही अधिकारीस्तरावर असल्याने कौशल्य विकासाच्या अंमलबजावणीवर त्याचा थेट परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या कर्मचारी-अधिकारी संघटनेने शासनाकडे रिक्त जागांच्या संदर्भात वेळोवेळी पाठपुरावा केला असतानाही त्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने कर्मचा-यांवर कामांचा अधिक ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१२-०६-२०१७) :**(१) होय, हे अंशत खरे आहे.

(२) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत गट- अ, ब, क व ड संवर्गात १४६३५ इतकी पदे मंजूर असून, त्यापैकी ४२७१ पदे रिक्त आहेत. यामध्ये गट-अ व ब संवर्गातील अधिकारी स्तरावरील मंजूर ९०१ पदांपैकी ३८० पदे रिक्त आहेत. तथापि, सदरहू रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपवून कामकाज सुरळीतपणे सुरु आहे. तसेच गट-क संवर्गातील रिक्त असलेल्या शिक्षकीय पदांवर तासिका तत्वावर शिक्षकांची नेमणूक करुन प्रशिक्षण सुरु आहे. त्यामुळे कौशल्य विकासाच्या अंमलबजावणीवर परिणाम झालेला नाही.

(३) गट-अ व ब संवर्गातील अधिकाऱ्यांची रिक्त असलेली पदे तसेच गट-क संवर्गातील रिक्त असलेली पदेही सरळसेवेने व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. गट-ड संवर्गातील पदे वित्त विभागाच्या धोरणानुसार मंजूर पदांपैकी २५% पदे निरसीत करावयाची असून, पदांच्या आढाव्यांतर्गत समायोजनाची कार्यवाही करण्यासाठी गट-ड संवर्गातील पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करडी (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत**

**(३२) ७५०९६ (२१-०४-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैनगंगा नदीमुळे विभागलेल्या करडी या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे निवेदन कौशल्य विकास मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ मार्च, २०१६ ला दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१२-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) प्रत्येक तालुक्यात एक औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्याचे राज्य शासनाचे धोरण असून मोहाडी तालुक्यात एक संस्था कार्यरत असल्याने मोहाडी तालुक्यात अन्य ठिकाणी औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करणे शक्य नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील दांडेकर पूल परिसरात क्रिकेट खेळताना आंबिल ओढयात**
**पडून मुलाचा मृत्यू झाल्याबाबत**

**(३३) ७५६७० (२१-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील दांडेकर पूल परिसरात क्रिकेट खेळताना चेंडू काढण्यासाठी गेलेला मुलगा दत्तवाडी येथे आंबिल ओढयात खालच्या बाजूस पडलेल्या खड्डयातून वाहून गेल्याची घटना माहे जानेवारी, २०१७ दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांडपाणी वाहून नेणा-या वाहिनीच्या आच्छादनाची दुरावस्था झाल्यानेच ही घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर वाहिनीच्या आच्छादनाच्या दुरावस्थेकडे दुर्लक्ष करणाऱ्या बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) व (२) पुणे शहरातील आंबिल ओढयामध्ये टाकण्यात आलेल्या मलवाहिनीवरील मॅनहोल चेंबरमध्ये पडून वाहून गेल्याने दिनांक ७.१.२०१७ रोजी एका मुलाचे अपघाती निधन झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

सदर ठिकाणी दुर्घटनेच्या एक दिवसापूर्वी जे.सी.बी. च्या सहाय्याने चेंबर फोडल्याचे व पाणी वळविल्याचे समजल्यामुळे संबंधीत जे. सी.बी. ऑपरेटरवर दत्तवाडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) याप्रकरणी जबाबदार असणा-या अधिकारी/कर्मचा-यांची चौकशी करण्याबाबत पुणे महानगरपालिकेसे कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌वभवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत लॉज तसेच लेडीज बार चालविण्यात येत असल्याबाबत**

**(३४) ७६९५४ (२१-०४-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण - डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) हद्दीतील वर्तकनगर उपवन परिसरातील सत्यम लॉज व शीळ फाट्यावरील तीन लेडीज बार, १० लॉज, २० हुक्का पार्लर व ४०० हुन अधिक गॅरेजवर माहे डिसेंबर, २०१६ मध्ये कारवाई करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण - डोंबिवली महानगरपालिका हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत लॉज तसेच लेडीज बार चालविण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अनधिकृत लॉज व लेडीज बारवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१७) :**(१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या महामार्गावरील सर्व बार बंद करण्याच्या निर्णयानुसार कल्याण रोडवरील सर्व बार बंद झाले आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील नव्याने समाविष्ट**
**२७ गावातील अनाधिकृत बांधकामाबाबत**

**(३५) ७६९६४ (२१-०४-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील नव्याने समाविष्ट २७ गावांना अनाधिकृत बांधकामाचा विळखा बसल्याचे दिनांक २० जानेवारी २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महानगरपालिका जबाबदार अधिकाऱ्यांना पाठीशी घालत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील नव्याने समाविष्ट २७ गावांतील बहुतांश बांधकामे ही ग्रामपंचायत काळातील असून ती अनधिकृत आहेत.

विद्यमान परिस्थितीत महानगरपालिकेने रितसर बांधकाम परवानगी देण्यासाठी महानगरपालिकेच्या नगरचना विभागामार्फत व्यवस्था केली आहे. त्या व्यतिरिक्त होणाऱ्या विनापरवानगी बांधकामांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी महानगरपालिकेने विहित कायदेशीर कार्यप्रणाली निश्चित केली आहे.

त्यानुसार उपलब्ध होणाऱ्या पोलीस बंदोबस्तासह अनधिकृत बांधकामांवर कार्यवाही करण्याची प्रक्रिया महानगरपालिकेकडून निरंतर सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**“फेरीवाला झोन” योजनेबाबत**

**(३६) ७७०३९ (२१-०४-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील दिवसेंदिवस वाढणारा फेरीवाल्यांचा त्रास लक्षात घेऊन शासनाने “फेरीवाला झोन” योजनेला मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावित 'फेरीवाला' योजनेअंतर्गत मुंबईत ४ लाख फेरीवाले असतांना केवळ ९० हजार फेरीवाल्यांचा सदर योजनेत समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर फेरीवाला योजनेत समाविष्ट असलेल्या ९० हजार फेरीवाले वगळता उर्वरित ३ लाख १० हजार फेरीवाल्यांबाबत शासनाने कोणती पर्यायी उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला आहे वा सदर फेरीवाल्यांचा पुन्हा सर्व्हे करण्यासाठी मंत्री मंडळाची उप समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, फेरीवाला योजनेची एकुण सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१), (२) व (३) केंद्र सरकारद्वारा मे, २०१४ रोजी पदपथ विक्रेते (उपजीविका संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन) अधिनियम २०१४ लागू करण्यात आला आहे.

सदर अधिनियमातील कलम ३६(१) नुसार शासनाने महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६ अन्वये दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी नियमावली व कलम ३८(१) नुसार दिनांक ०९ जानेवारी, २०१७ रोजी पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) २०१७ योजना प्रसिध्द केली आहे.

त्यातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे.

तथपि, सदर फेरीवाल्यांचा पुन्हा सर्व्हे करण्यासाठी मंत्री मंडळाची उप समिती नेमण्यात आली आहे हे खरे नाही.
(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नगर पथविक्रेता समिती गठीत करण्यात येत आहे.

---

**ठाणे येथील गणेश दर्शन इमारतीचा स्लॅब कोसळून झालेला अपघात**

**(३७) ७७५११ (२१-०४-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील गणेश दर्शन इमारतीचा तिस-या मजल्यावरील स्लॅब कोसळून २ व्यक्ती गंभीर जखमी झाल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीचे बांधकाम करण्याची परवानगी महापालिकेकडून संबंधित विकासकाला देण्यात आली होती काय व असल्यास, केव्हा,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१७) :**(१) होय हे खरे आहे.

दिनांक ११.०१.२०१७ रोजी ठाणे महानगरपालिका हद्दीतील एदली रोड येथील गणेश दर्शन ही तळ+४ मजली इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील सीलींगचा स्लॅब रात्री ८.०७ वा. कोसळला सदर घटनेमध्ये २ व्यक्ती किरकोळ जखमी झाले होते.
(२) नाही.

महापालिकेकडील कर आकारणी अहवालानुसार सदरची इमारत ही पुर्णपणे अनधिकृत होती. सदर इमारतीस दिनांक ०१.०१.१९९५ पासून कर आकारणी करण्यात आल्याचे महापालिका दप्तरी असलेल्या कर आकारणी अहवालावरुन दिसून येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर महानगरपालिकेत (जि.ठाणे) असलेल्या शांतीनगर येथील डंपिंग ग्राउंडची क्षमता संपली असल्याबाबत**

**(३८) ७७९२८ (२१-०४-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेत (जि.ठाणे) असलेल्या शांतीनगर येथील डंपिंग ग्राउंडची क्षमता संपली असून शहरात कचऱ्याचे साम्राज्य झाले आहे व त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेने डंपिंगसाठी वन विभागाचा भूखंड मागीतला असून याबाबत शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा कोणती पर्यायी उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१), (२) व (३) सन १९९६-९७ पूर्वी शांतीनगर येथील जागेचा डंपिंग ग्राऊंड म्हणून उल्हासनगर नगरपालिकेमार्फत वापर करण्यात येत होता. तथापि, सन १९९६-९७ पासून शांतीनगर येथील डंपिंग ग्राऊंडवर कचरा टाकण्यात येत नसून तो राणा ट्रेडींग कंपनी जवळ म्हारळ गांव जवळील डंपिंग ग्राऊंडच्या जागेत टाकण्यात येत होता.

परंतु सदर डंपिंग ग्राऊंडची क्षमता संपल्याने दुसरा पर्याय उपलब्ध नसल्यामुळे दिनांक ०३.१०.२०१६ पासून खडी मशिन, गायकवाड पाडा येथील पडीत खाणीत कचरा टाकण्यात येत आहे.

तथापि, उल्हासनगर महानगरपालिकेकडून शहरातील पूर्ण कचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांच्यामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता महानगरपालिकेस जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**नवी मुंबई शहराला मुबलक पाणी पुरवठा होण्याबाबत**

**(३९) ७८१३५ (२१-०४-२०१७). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहरात मोरबे, एमआयडीसी आणि सिडकोच्या हेटवणे धरणातून पाणी पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक नागरिकांना गरजेपुरतेही पाणी मिळत नसल्यामुळे नागरिक आंदोलन करणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवीमुंबई शहराला मुलबक पाणी पुरवठा होण्यासाठी शासन कोणती कार्यवाही वा उपाययोजना करणार वा करित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) होय.

नवी मुंबई शहराला नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचे मोरबे धरण आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या बारवी धरणातून पाणी पुरवठा करण्यात येतो. मात्र, सिडकोच्या हेटवणे धरणातून नवी मुंबई महानगरपालिकेस पाणी पुरवठा करण्यात येत नाही.
(२) हे खरे नाही.
(३) नवी मुंबई शहराला आवश्यक पाणी पुरवठा नियमितपणे करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील किशोर वयातील युवक व युवतींमध्ये मद्‌यपानाचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(४०) ७९३१५ (२१-०४-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील किशोर वयातील युवक व युवतींमध्ये मद्‌यपानाचे प्रमाण वाढत असल्याचे निरीक्षण मुंबईतील केईएम रुग्णालयाच्या मानसोपचार विभागाने नोंदविले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्‌य:स्थितीत मद्‌यपान करणा-यांचा वयोगट बारा ते चौदापर्यत खाली आला असल्याने हे तरुण पिढीच्या विकासासाठी घातक आहे हे लक्षात घेता किशोर वयातील युवक व युवतींच्या मद्‌य प्राशनाला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) किशोर वयातील युवक व युवतीच्या मद्‌यप्राशनाला आळा घालण्यासाठी महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-
• शाळांमधून मुले, पालक व शिक्षकांसाठी मद्‌यपान विरोधी जनजागृतीकरिता पोस्टर प्रदर्शन, मार्गदर्शनपर व्याख्याने व कार्यशाळा राबवल्या जातात.
• स्वयंसेवी संस्थांबरोबर डॉक्टर, समुपदेशक व समाजसेवक व्याख्याने आयोजित करण्यात येतात.

• अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांच्यासह मुंबईतील अनेक शाळा व महाविद्यालयांमध्ये व्यसनमुक्तीपर विविध प्रकारचे जनजागृतीचे कार्यक्रम व व्याख्याने घेतली जातात.
• तसेच, दिनांक ३१ मे रोजी "तंबाखुमुक्त दिन" व दिनांक २६ जून रोजी "व्यसनमुक्ती दिन" च्या अनुषंगाने विविध जनजागृतीपर कार्यक्रम केले जातात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावनेर (जि.नागपूर) नगरपरिषद अंतर्गत शहराकरिता मंजूर केलेल्या मल:निसारण योजनेबाबत**

**(४१) ७९८०६ (२१-०४-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील सावनेर नगरपरिषद अंतर्गत शहराकरिता दिनांक २८ सप्टेंबर, २००६ मध्ये ६३१ लक्ष रुपये किंमत असलेली मल:निस्सारण योजना मंजूर करण्यात आली असता नगरपरिषद सावनेर मार्फत कंत्राटदारांची नेमणूक करुन काम करण्यास सांगितले असता त्यांनी अगदी मंद गतीने काम सुरू केल्यामुळे त्या कंत्राटदाराकडून काम काढून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण महामंडळाच्या वतीने सुरू करण्यात आले असून काही कामे शिल्लक असून कामे ही वाढल्यामूळे सुधारीत अंदाजपत्रक तयार करून अंतिम मंजूरीकरिता दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन, वरळी, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आले असता अद्यापही या वाढीव प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सावनेर नगरपरिषद अंतर्गत शहराकरिता मल:निस्सारण योजनेच्या वाढीव प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१७) :**(१), (२) व (३) • युआयडीएसएसएमटी अंतर्गत मंजूर सावनेर भुयारी गटार प्रकल्पाचे काम मंदगतीने सुरु असल्याने कंत्राटदारांचा निविदा करार रद्द करण्यात आला आहे. उर्वरीत काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पूर्णठेव तत्वावर दिले आहे.
• तथापि सावनेर शहराच्या हद्दवाढीच्या अनुषंगाने योजनेच्या व्याप्तीमध्ये बदल करणे आवश्यक असल्याने त्याअनुषंगाने शहराची सध्याची योजना रद्द करावी किंवा कसे याबाबत निर्णय घेण्याच्या अनुषंगाने सावनेर नगरपरिषद मार्फत मार्गदर्शन मागविण्यात आले आहे.
• त्याअनुषंगाने सदर प्रकल्प रद्द करावयाचा असल्यास सदर प्रकल्पास वितरीत केलेला निधी व्याजासह शासनास परत करून नव्याने प्रस्ताव सादर करणे अपेक्षित आहे. त्याअनुषंगाने स्वयंस्पष्ट निर्णय सावनेर नगरपरिषदेने घेणे अपेक्षित आहे.

---

**भिवंडी-निजामपूर महापालिकेच्या प्रभाग समिती ३ च्या आरोग्य निरीक्षकांस झालेली मारहाण**

**(४२) ८०११४ (२१-०४-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर महापालिकेच्या प्रभाग समिती ३ च्या आरोग्य निरीक्षकांने कचरा ठेकेदार श्री. अनिल शेट्टी यांना सफाईच्या कामासाठी वापरले जाणारे डम्पर, जेसीबी, घंटागाड्या यांची नोंद करण्यासाठी आणि सफाईची रुपरेषा ठरविण्यासाठी सांगितल्याने कचरा ठेकेदारांने आरोग्य निरीक्षकांस मारहाण केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत आरोग्य निरीक्षकांने कचरा ठेकेदारांने केलेल्या मारहाणीबाबत पोलिस ठाणे तक्रार करुनही कचरा ठेकेदारांविरुध्द पोलिसांनी अद्यापही कोणतीही कारवाई न केल्याने महापालिकेतील कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष पसरलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१७) :**(१) होय.

श्री. गुळवी, प्रभाग आरोग्य निरिक्षक यांना त्यांना दि. ३०.१०.२०१६ रोजी मारहाण झाली होती. त्यांनी या प्रकरणी वैकक्तीक तक्रार दि. ३०.१०.२०१६ रोजी पालिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) व (३) या प्रकरणी आयुक्त भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका यांना खालीलप्रमाणे सुचना देण्यात आल्या आहेत.

१. याबाबत संबंधित पोलिस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आलेल्या कारवाईबाबत नियमोचित कारवाई करण्याबाबात पाठपुरावा करावा

२. तसेच याप्रकरणी संबंधित ठेकेदाराविरुध्द नियमोचित कडक कारवाई करावी.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी पालिकेच्या आरोग्य केंद्रात शासनाच्या बालस्वास्थ योजनेअंतर्गत काम करणाऱ्या परिचारिकांसह डॉक्टरांना थकीत वेतन देण्याबाबत**

**(४३) ८०३८० (२१-०४-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर महापालिकेच्या (जि.ठाणे) आरोग्य केंद्रात शासनाच्या बालस्वास्थ योजनेअंतर्गत मागील १० वर्षापासून नियमित सेवा करणा-या ४५ परिचारिकांसह ५५ डॉक्टरांना गत १० महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांना भेटण्याकरिता गेलेल्या कर्मचा-यांना आयुक्तांनी भेट दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय तसेच परिचारिकांसह डॉक्टरांना तातडीने थकीत वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१७) :**(१), (२) व (३) भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका अंतर्गत एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे थकित वेतन एप्रिल २०१७ मध्ये अदा करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आरे वसाहतीतील ३ आदिवासी पाड्यांना चित्रनगरी व २ पाड्यांना फोर्स-वन यांचे पाणीपुरवठा सुरु करण्याबाबत

**(४४) ८१४७५ (२०-०४-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरे वसाहतीतील ३ आदिवासी पाड्यांना चित्रनगरी व २ पाड्यांना फोर्स-वन यांचे पाणीपुरवठा सुरु करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र मिळाले आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणचा पाणीपुरवठा नियमितपणे सुरु झाला आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) होय.
(२) व (३) फोर्स-वनच्या अखत्यारीतील आदिवासी पाडयांना पाणी पुरवठा करण्यासाठी जलवाहिन्या टाकण्याचे काम पूर्ण झाले असून त्याठिकाणी लवकरच महानगरपालिकेमार्फत जलजोडण्या देऊन पाणी पुरवठा सुरु करण्यात येणार आहे.

चित्रनगरीच्या अखत्यारीत असलेल्या आदिवासी पाडयांसाठी २ ठिकाणी सहाय्यक शोषण टाक्या बांधणे व जलवाहिन्या टाकण्याच्या कामासाठी महानगरपालिकेमार्फत निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येऊन, शोषण टाकी बांधणे व जलवाहिन्या टाकण्याचे काम सुरु करण्यात येणार आहे.

सदर काम सुरु झाल्यानंतर साधारणत: १२ महिन्यांच्या कालावधीमध्ये काम पूर्ण करुन चित्रनगरीच्या अखत्यारीतील आदिवासी पाडयांना पाणी पुरवठा सुरु करण्यात येणार आहे.

---

**वसई-विरार शहर महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या तत्कालीन वसई नगरपरिषदेने विहीत वयोमर्यादेपेक्षा अधिक वय असलेल्या आठ कर्मचा-यांच्या नेमणूका केल्याबाबत**

**(४५) ८१४९० (२१-०४-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या तत्कालीन वसई नगरपरिषदेने विहीत वयोमर्यादेपेक्षा अधिक वय असलेल्या आठ कर्मचा-यांच्या नेमणूका केल्या होत्या, त्यातील काही कर्मचारी सेवानिवृत्त झाले असुन वय क्षमापीत न झाल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ नुसार निवृत्तीवेतन व इतर लाभ देता येणे शक्य झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार शहर महापालिकेल्या आयुक्तांनी दि. २०/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सचिव, नगरविकास ह्यांचेकडे वय क्षमापीत करुन देण्याची मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने प्रस्तुत प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१७) :**(१) होय हे खरे आहे.

(२), (३) व (४) वसई-विरार महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या तत्कालीन विरार नगरपालिकेतील ८ कर्मचाऱ्याचे वय क्षमापित करण्याचा प्रस्ताव विभागास प्राप्त झाला आहे. उक्त प्रस्तावाचा विचार करता शासन निर्णय २५/४/२०१६ च्या तरतूदीच्या अनुषंगाने उक्त ८ कर्मचाऱ्यांपैकी ५ कर्मचाऱ्याचे वय क्षमापित करण्यात आले आहे.

---

**वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील १४ शासकीय रुग्णालये व २ महापालिकेच्या रुग्णालयात अद्यावत रुग्णालयीन सुविधा व डॉक्टरांचा अभाव असल्याबाबत**

**(४६) ८१५२२ (२१-०४-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील १४ शासकीय रुग्णालये व दोन महापालिकेच्या रुग्णालयात अद्यावत सुविधा व डॉक्टरांचा अभाव असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबीची चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने स्थानिक नागरिकांना महापालिका रुग्णालयात अद्यावत सुविधा पुरेशा मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१७)** :(१) हे खरे नाही

आयुक्त वसई-विरार महानगरपालिका यांच्या अहवालात त्यांनी महानगरपालिका क्षेत्रात २ रुग्णालय, १ माताबाल संगोपन केंद्र, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असल्याचे नमूद केले आह.

वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात डॉक्टरांची उपलब्धता खालीलप्रमाणे आहे.

| | पूर्णवेळ | मानद |
|---|---|---|
| तज्ञ वैद्यकीय अधिकारी | १७ | ३५ |
| वैद्यकीय अधिकारी | ८७ | - |

उपरोक्त रूग्णालयात नागरीकांना अद्यावत सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

(२) व (३) वसई-विरार महानगरपालिकेमार्फत कंत्राटी तत्वावर तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्तीसाठी वारंवार वर्तमानपत्रात जाहिराती देण्यात येतात.

तथापि पूर्णवेळ तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अनउपलब्धतेमूळे मानद तत्वावर वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सेवा अबाधित ठेवण्यात येतात.

---

**औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थांचे विद्यावेतन दरमहा वाढविणेबाबत**

**(४७) ८२५४२ (२०-०४-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवसाय प्रशिक्षण परियोजना सन २०१४ या शोध प्रबंधातील विविध मागण्या मान्य करुन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थांचे विद्यावेतन दरमहा वाढविणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २३ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राव्दारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१२-०६-२०१७)** :(१) व्यवसाय प्रशिक्षण परियोजना सन २०१४ या शोध प्रबंधातील विविध मागण्या शासनास प्राप्त झाल्या असून, या मागण्यामध्ये विद्यावेतनात वाढ करण्याच्या मागणीचा समावेश आहे. सदर शोध प्रबंधाच्या प्रस्तावासोबत जोडलेल्या कागदपत्रामध्ये लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदयांना लिहिलेल्या दिनांक २३.११.२०१४ च्या पत्राची प्रत सहपत्रित केलेली आहे.

(२) औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांचे विद्यावेतनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई महानगरपालिका शाळांमध्ये ई-लर्निंगसाठी एजन्सीच नियुक्त करण्यात आले नसल्याबाबत**

**(४८) ८२७०७ (२०-०४-२०१७). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिका शाळांमध्ये ई-लर्निंगसाठी एजन्सीच नियुक्त करण्यात आलेली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या मे महिन्यापासून ई-लर्निंगद्वारे दिले जाणारे संगणकीय प्रशिक्षण बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग देण्याकरीता नियुक्त एजन्सीची मुदत संपल्याने तत्कालीन आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांच्या मान्यतेने दि.११/०९/२०१५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र योग्य प्रतिसाद न मिळाल्याने सदर निविदेस ३ वेळा मुदतवाढ देण्यात आली होती.

सदर निविदा प्रक्रियेत मे.कॉम्प्युटर बिझनेस मॅनेजमेंट, मुंबई यांची एकमेव ऑनलाईन निविदा प्राप्त झाली होती. या निविदेतील दर प्रशासकीय मान्यतेच्या दरापेक्षा १०३% जास्त असल्याने संबंधित निविदाधारकास दर कमी करुन प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार प्राप्त झालेल्या सुधारीत प्रस्तावाच्या अनुषंगाने दि.१४/०७/२०१६ रोजी तत्कालीन आयुक्त, अभ्यासक्रम समिती व तांत्रिक समिती यांच्या समक्ष निविदाधारकांनी तयार केलेल्या ई-लर्निंग प्रणालीचे सादरीकरण करण्यात आले.

मात्र प्रस्तुत सादरीकरण विद्यार्थी केंद्रीत व उद्दिष्टांशी सुसंगत नसल्यामुळे तत्कालीन आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी सदर निविदा तांत्रिक बाबींसाठी अपात्र ठरविली. तसेच, सदर निविदा रद्द करुन पूर्णतः ई-लर्निंगवर आधारीत सुधारीत निविदा प्रक्रिया सादर करण्याबाबत आदेशीत करण्यात आले.

सद्यस्थितीत नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांकरीता Audio Visual च्या माध्यमातून ई-लर्निंग देण्याबाबतची सुधारीत निविदा प्रक्रिया नवी मुंबई महानगरपालिकेकडून सुरु आहे.

---

**औरंगाबाद महानगरपालिका कार्यालय येथे हिशोबी बील विभागात पात्र नसताना श्री संजय पवार यांची नेमणूक कायम ठेवण्यात आल्याबाबत**

**(४९) ८२८२८ (२१-०४-२०१७). श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिका कार्यालय येथे हिशोबी बील विभागात पात्र नसताना श्री संजय पवार यांची नेमणूक कायम ठेवण्यात आली होती व वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी व नगरसेवक ही यांच्या मनमानी कारभारामुळे त्रस्त होते व त्यांची सेवा पुस्तकात ही लाल शाईने श्री.दिलीप बंड (भा.प्र.से) माजी महानगरपालिका आयुक्त, औरंगाबाद यांनी शेरा लिहिलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१० ते २०१५ या पाच वर्षाचे काळात कनिष्ट अभियंता यांना अनेक बनावट बील काम न करता महानगरपालिका कार्यालय औरंगाबाद यांचेमार्फत अदा करण्यात आले व नंतर बनावट स्वाक्षरी करून संचिका फाईल तयार केल्याचे ही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी अतिरिक्त आयुक्तांचे पाचारण महानगरपालिका कार्यालय औरंगाबाद येथे झाले व सखोल चौकशी नंतर श्री संजय पवार प्रभारी मुख्य लेखाधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांचे निलंबन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तब्बल सहा फायलींवर बनावटी सह्या व रक्कम वसुलीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१७) :**(१) होय, हे अंशतः खरे आहे.

श्री.संजय पवार यांनी वित्तीय औचित्याचा भंग करुन, आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केल्यामुळे, औरंगाबाद महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्यामुळे, त्यांना भविष्यात लेखा विभागात कधीही पदस्थापना देण्यात येवू नये, या आदेशाची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात लाल शाईने घेण्याचे निर्देश तत्कालिन आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी दिले त्यानुसार त्यांच्या सेवापुस्तकात लाल शाईने नोंद घण्यात आली आहे.

तथापि उक्त प्रकरणाच्या चौकशी अहवालाअंती त्यांच्याविरुध्दचे दोषारोप सिध्द न झाल्यामुळे त्यांना चौकशीतून मुक्त करण्यात आले होते. त्यामुळे त्यांच्या सेवापुस्तकात लाल शाईने घेतलेल्या आदेशाची नोंद रद्द करण्याबाबत त्यांनी विनंती केली असता, तत्कालीन आयुक्त, औरंगाबाद महानगपालिका यांच्या मान्यतेनुसार दि.२.७.२०१४ च्या आदेशान्वये सदर नोंद रद्द करण्यात आलेली आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) हे अंशतः खरे आहे.

श्री.संजय पवार लेखाधिकारी तथा प्रभारी मुख्य लेखाधिकारी यांना व्दिनोंद लेखा पध्दतीच्या प्रक्रिया, एजन्सीला मुदतवाढ व देयक अदा करणे प्रकरणी दि.१३.२.२०१७ रोजी निलंबित करण्यात आलेले आहे.
(४) सदर प्रकरणात त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली असून चौकशीचे काम प्रगतीपथावर आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

## पुणे जिल्हयाच्या दौंड तालुक्यातील कुरकुंभ, सहजपूर, नांदूर परिसरातील औद्योगिक वसाहतीत महिला सुरक्षारक्षक नेमणेबाबत

**(५०) ८३२६८ (२०-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड तालुक्यातील (जि.पुणे) कुरकुंभ, सहजपूर, नांदूर परिसरातील औद्योगिक वसाहतीतील महिला कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी महिला सुरक्षारक्षक नेमणेबाबत महिला कामगारांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी महिला सुरक्षा रक्षक नेमणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१४-०६-२०१७) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

अशा कोणत्याही प्रकारची तक्रार १) पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे २) कामगार उप आयुक्त कार्यालय, पुणे ३) अपर कामगार आयुक्त कार्यालय, पुणे येथे प्राप्त झालेली नाही. तसेच पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पुणे ग्रामीण यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार हया परिसरात कोणतीही तक्रार अथवा गुन्हा दाखल झाला नसल्याचे कळविण्यात आले आहे. तसेच प्रस्तुत ठिकाणी महिला सुरक्षा रक्षक नेमण्याबाबतही महिला कामगारांकडून पोलीस विभागाकडे मागणी करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.